■ दैनिक ■ धाराशिव ■ वर्ष 2 रे ■ अंक 82 ■ शुक्रवार दि. 2 मे 2025 ■ RNI NO .-2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू 5

दैनिक
आरंभ मराठी
arambhmarathi535@gmail.com

# ओमराजे-राणा पाटील भिडले, पालकमंत्र्यांनी हात जोडले

## जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत खासदार-आमदारांमध्ये ड्रग्स प्रकरणावरून संघर्ष



आरंभ मराठी | धाराशिव

महाराष्ट्र दिनानिमित्त गुरुवारी (दि.१) नियोजन भवन सभागृहात आयोजित केलेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बठकीत पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या समोरच खासदार ओमराजे आणि आमदार राणा पाटील एकमेकांवर तुटून पडले. जिल्हा नियोजन समितीच्या कामांना स्थगिती दिल्याच्या कारणावरून ही बैठक वादळी ठरेल असे बोलले जात होते. त्याप्रमाणे ही बैठक अतिशय वादळी ठरली. खासदार ओमराजे आणि आमदार राणा पाटील हे दोघेही कामांना दिलेल्या स्थगितीच्या कारणावरून ते तुळजापूर ड्रग्ज प्रकरणावरून हमरीतुमरीवर आल्याचे दिसले. शेवटी पालकमंत्री सरनाईक यांनी मध्यस्ती करत विकास कामासाठी एकत्र या अशी विनंती करून वाद मिटवला.



बैठक सुरू होताच खासदार ओमराजे यांनी पालकमंत्री यांना कामांना स्थगिती कोणी दिली आणि का दिली? तसेच यामागचा झारीतील शुक्राचार्य नेमका कोण आहे याचे उत्तर जनतेला कळू द्या असे म्हटले. पालकमंत्री यांना अंधारात ठेवून जिल्ह्यात कोणती ताकत आहे, जी विकास कामांना स्थगिती देते असा सवाल केला. यावर पालकमंत्री यांनी काही उत्तर देण्यापूर्वीच आमदार राणा पाटील यांनी, कामांना देण्यात आलेली स्थगिती ही मुख्यमंत्री पातळीवर देण्यात आलेली असून, ज्याला उत्तर हवे आहे, त्याने मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांना भेटून स्थगितीचे कारण जाणून घ्यावे असा टोला हाणला. तसेच आर्थिक वर्ष ३१ मार्चला संपले असताना ही कामे वर्षभर का झाली नाहीत असाही सवाल आमदार राणा पाटील यांनी उपस्थित केला. ज्या कामांना स्थगिती देण्यात आली आहे त्या कामांवर बरेच आक्षेप घेण्यात आलेले असून, चुकीच्या पद्धतीने ही कामे केली जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून, वेळ आल्यावर त्या सर्व कामांचा खुलासा जाहीरपणे केला जाईल असा इशारा आमदार राणा पाटील यांनी नाव न घेता ओमराजे यांना दिला. यावेळी आमदार राणा पाटील यांनी तुळजापूर ड्रग्ज प्रकरणाचा विषय काढून तुळजापूर शहराला जाणूनबुजून बदनाम केले जात असल्याचा आरोप केला. हे प्रकरण मी स्वतः समोर आणले असून, पोलीस अधीक्षक यांना या प्रकरणाची माहिती सुरुवातीला मीच दिली होती, त्यामुळे ड्रग्ज प्रकरण उजेडात आले असल्याचा दावा आमदार राणा पाटील यांनी केला. यावर खासदार ओमराजे यांनी ड्रग्ज प्रकरणातील आरोपी जाहीर पत्रकार परिषद घेऊन माझा बाप काढतात आणि पातळी सोडून बोलतात, ड्रग्जचे प्रकरण सप्टेंबर महिन्यात उजेडात आले असताना विधानसभा निवडणुका होईपर्यंत हे प्रकरण का दाबले? असा सवाल केला. या प्रकरणी २२ आरोपी आणखी फरार असून, पोलिसांवर नेम का कोणाचा दबाव आहे असा सवाल ओमराजेंनी पालकमंत्री यांना केला. तसेच जिल्ह्यातील सर्व राजकीय नेत्यांचे फोन कॉल रेकॉर्ड तपासून यातील आरोपी असणाऱ्यांना फासावर लटकवा अशी मागणी ओमराजेंनी यावेळी केली. यावेळी ओमराजे आणि राणा पाटील यांचात जोरदार शाब्दिक चकमक झाली. दोघांनाही थांबवण्याचा पालकमंत्री सरनाईक यांनी खूपदा प्रयत्न केला परंतु, दोघांनीही माईक बंद न करता बोलणे सुरूच ठेवल्यामुळे पालकमंत्री वैतागल्याचे चित्र दिसत होते. जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक यांच्यासह सर्व सभागृह यावेळी काहीवेळा स्तब्ध झाले होते. शेवटी पालकमंत्री सरनाईक यांनी सगळ्यांनी माईक बंद करा आता मी एकटा बोलणार म्हणत, बोलणे सुरू केले.

### ड्रग्ज मुक्तीसाठी ९ कोटी

धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर आणि परंडा तालुक्यात ड्रग्जचे जाळे आढळून आले आहे. जिल्ह्यातील ड्रग्ज चा नायनाट करण्यासाठी परिवहन खात्याकडून धाराशिव जिल्ह्याला ९ कोटी रुपये देण्याची घोषणा सरनाईक यांनी यावेळी केली. या निधीतून शाळा आणि महाविद्यालयात ड्रग्ज मुक्ती अभियान राबविण्यात येणार आहे. तसेच पोलीसांना काही साहित्य घेण्यात येणार आहे.



### माझ्याबद्दल तक्रार असेल तर मुख्यमंत्र्यांना सांगा

मी जिल्ह्याचा विकास करण्यासाठी धाराशिव जिल्ह्यात आलोय. धाराशिव जिल्हा आकांक्षीत असल्यामुळे मी विकासाचे व्हिजन घेऊन इथे पालकमंत्री म्हणून आलो आहे. परंतु, इथे प्रत्येक गोष्टीवर राजकारण होणार असेल तर जिल्ह्याचे प्रश्न कधीच सुटणार नाहीत असे पालकमंत्री सरनाईक म्हणाले. माझ्याबद्दल किंवा माझ्या काम करण्याच्या पद्धतीबद्दल तक्रारी असतील तर थेट मला सांगा मी बदल करेन. परंतु, हे ही शक्य नसेल तर मुख्यमंत्र्यांकडे माझी तक्रार करा आणि दुसरा पालकमंत्री घ्या असे सरनाईक म्हणाले. पक्षविरहित विकास करण्याला माझे प्राधान्य असून, सर्व लोकप्रतिनिधींनी मला सहकार्य करावे असेही आवाहन सरनाईक यांनी यावेळी केले.

### पत्रकारांना प्रवेश नाकारणारे शुक्राचार्य कोण?

जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत पत्रकारांना कायम प्रवेश असेल असे आदेश पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी मागील दौऱ्यावेळी दिले होते. तरीही, यावेळी सकाळीच पत्रकारांना बैठकीत प्रवेश नसल्याचा संदेश माहिती कार्यालयाकडून देण्यात आला होता. यावर सर्व पत्रकारांनी एकत्र येत पालकमंत्री यांच्या कानावर ही गोष्ट घातली असता पालकमंत्री यांनी जिल्हाधिकारी पुजार यांना हा निर्णय कोणी घेतला असा सवाल केला. यावर जिल्हाधिकाऱ्यांना काहीच माहिती नसल्यामुळे त्यांनी जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे यांना याबद्दल जाब विचारला. खडसे यांनी पत्रकारांना प्रवेश नाकारणारे त्यांना आलेले पत्र जिल्हाधिकारी यांना दाखवले. यावर जिल्हाधिकारी यांनी पत्रकारांना बैठकीत बसण्याची अनुमती असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे पत्रकारांना बैठकीत प्रवेश मिळाला. परंतु, या बैठकीपासून पत्रकारांना दूर ठेवण्याचा डाव कोणी रचला होता याचे उत्तर शेवटपर्यंत मिळाले नाही. पालकमंत्री सरनाईक यांनी मात्र मी पालकमंत्री असेपर्यंत सर्व पत्रकारांना सर्व बठकीत प्रवेश दिला जाईल असे आश्वासन दिले.

### बैठकीत हे झाले महत्वाचे निर्णय

१) जिल्ह्याच्या ठिकाणी ५ स्विमिंग पूल तयार करण्याचा निर्णय घेतला. यामुळे जिल्ह्यात जलतरणपटू तयार होतील.
२) एमपीएससी व यूपीएससी स्पर्धा परीक्षा केंद्र सुरू करून तरुणांना मोफत सुविधा देण्यात येतील.
३) जिल्ह्यातील महिला बचत गटांना २ टुरिस्ट बस देण्यात येणार
४) महिला बचत गटांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळावी यासाठी उमेद मॉल ची स्थापना
५) परिवहन खात्याकडून ड्रग्ज विरोधी मोहीम राबविण्यासाठी धाराशिव जिल्ह्याला ९ कोटी रुपयांची तरतूद.
६) २००० किमी चे शेतरस्ते तसेच पानंद रस्ते बनवणार त्यासाठी १० कोटींच तरतूद
७) पावसाळ्यात एका दिवसात १५ लाख वृक्षलागवड आणि संपूर्ण पावसाळ्यात ५० लाख वृक्ष लागवड करणार
८) कचरा डेपो स्थलांतराचा निर्णय एक महिन्यात घेणार तसेच बायोमायनिंगसाठी काही अडचण आल्यास राज्य सरकारकडून त्याची पूर्तता केली जाईल.

# पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते धाराशिवच्या नूतन बसस्थानकाचे उद्घाटन

आरंभ मराठी | धाराशिव

जिल्ह्यातील नागरिकांसाठी महत्त्वाचा क्षण ठरलेल्या धाराशिवच्या नूतन बसस्थानकाचे उद्घाटन गुरुवारी (दि.१) मोठ्या उत्साहात पार पडले. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी महामंडळ) वतीने उभारण्यात आलेल्या या अत्याधुनिक बसस्थानकाचे उद्घाटन परिवहन मंत्री, राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अध्यक्ष तथा पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, पोलिस अधिक्षक संजय जाधव, एस.टी महामंडळाच्या उपमहाव्यपस्थापक अमृता ताम्हणकर, विभाग नियंत्रक विनोद भालेराव यांच्यासह राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. नुतन बसस्थानक इमारतीत संरक्षक भिंत, सेप्टीक टँक आणि ड्रेनेज व्यवस्था, पाणी व्यवस्था, इलेक्ट्रिकम पॅनल रुम, पार्सल ऑफीस, कँटीन, रिझर्वेशन कक्ष, जेनेरिक मेडीकल, कंट्रोल केबीन आणि पेव्हर ब्लॉक बसविणे इ.गोष्टींचा अंतर्भाव करण्यात आला आहे. या नुतन इमारतीत महिलांसाठी हिरकणी कक्ष, सुसज्ज स्वच्छतागृह, अपंगांसाठी स्वच्छतागृह, रॅम्पची व्यवस्था, टॅकटाईल्स, सर्व प्रवाश्यांसाठी सुसज्ज प्रतिक्षालय, चौकशी कक्ष, पाण्याची व्यवस्था, कँटीन, चालक-वाहक विश्रांतीगृह असून वाणिज्य आस्थापनेसाठी १ जेनेरिक मेडीकल , ५ दुकाने बांधण्यात आली आहेत. बसस्थानकात २२ फलाट आहेत. सध्या



बसस्थानकातील फरशी काम, प्रसाधनगृहाचे प्लास्टर, पाणीव्यवस्था करणे, बसस्थानकाची रंगरंगोटी करणे, दरवाजे खिडक्या बसविणे, प्रवासी प्रतिक्षालयामध्ये सिलिंग बसविणे इ. कामे पुर्ण झालेली आहेत. तसेच वाहनतळाचे काँक्रीटीकरण एम.आय.डी.सी.मार्फत करण्यात येत आहे.

# गोरोबाकाकांच्या यात्रेत अवैध धंदे सुरू

## कारवाईच्या मागणीचे निवेदन

आरंभ मराठी | तेर

तेर येथील संत गोरोबाकाका यांच्या यात्रेत सुरू असलेले अवैध धंदे बंद करा अशी मागणी तेर येथील सरपंच दिदी लोकेश काळे यांनी ढोकी पोलीस स्टेशनच्या पोलीस निरिक्षक यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. दुसऱ्या एका प्रकरणात सरपंचाने उपसरपंचा विरूध्द एस.पी.कडे तक्रार केली आहे. वैराग्य महामेरू संत गोरोबाकाका यांची यात्रा २४ एप्रिल पासून चालू झाली आहे. यात्रा काळात अनुचित प्रकार घडू नये म्हणून यात्रा सुरळीत पार पाडण्यासाठी यात्रेमधील दोन नंबर अवैध धंदे (३ गाणी) बंद करावी, यात्रेमध्ये मोठ्या प्रमाणात भाविक येत असल्याने अवैध धंद्यामुळे यात्रेत अनुचित प्रकार घडण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे यात्रेतील दोन नंबर गाणी) बंद करण्याची मागणी सरपंच दिदी लोकेश काळे यांनी केली आहे. दुसऱ्या एका प्रकरणात जिल्हा पोलीस अधीक्षक यांना स्वतंत्र निवेदनाद्वारे सरपंच दिदी लोकेश काळे यांनी उपसरपंच श्रीमंत रमेश फंड यांनी मी एक महिला असूनही अश्लील भाषेत शिवीगाळ केली व जातीवर शिवीगाळ केली मला, व माझा पती लोकेश काळे, सासरा आप्पा काळे यांना जिवे मारण्याची धमकी दिली आहे. उपसरपंच श्रीमंत फंड यांच्यापासून मला व माझ्या कुटुंबाला धोका आहे, तरी त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करून योग्य तो न्याय द्यावा अशी मागणी सरपंच दीदी लोकेश काळे यांनी केली आहे.

# पुढील पंधरा दिवसात दहावी आणि बारावीचे निकाल जाहीर होणार



आरंभ मराठी | धाराशिव

पुढील पंधरा दिवसात इयत्ता दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षेचे निकाल जाहीर होणार असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे राज्यातील लाखो विद्यार्थ्यांच्या आणि पालकांच्या प्रतीक्षेला आता पूर्णविराम मिळणार आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने इयत्ता दहावी आणि बारावीच्या परीक्षांच्या निकालासंदर्भात मोठी माहिती दिली आहे. दिनांक १२ मे ते १४ मे दरम्यान बारावीचा निकाल, तर १५ किंवा १६ मे रोजी दहावीचा निकाल जाहीर करणार असल्याचे सांगण्यात आले आहे.फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये पार पडलेल्या या परीक्षांच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन पूर्ण झाले असून, सध्या गुणांची अंतिम पडताळणी आणि निकाल छपाईची प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे दोन आठवड्यात हे निकाल लागणार आहेत. राज्य सरकारने यावर्षी दहावी आणि बारावीच्या परीक्षा पंधरा दिवस अगोदर घेऊन शैक्षणिक वर्षामध्ये सुसूत्रता आणण्याचे प्रयत्न केले आहेत. परीक्षा लवकर झाल्यामुळे आता निकालही लवकर घोषित केल्यास अकरावी प्रवेशाच्या प्रक्रियेत गोंधळ होणार नाही अशा पध्दतीने शैक्षणिक वर्षाचे नियोजन करण्यात आले आहे.

# खरीप हंगामात शेतकऱ्यांना कृषी निविष्ठांचा वेळेत पुरवठा करा

## खरीप हंगाम पूर्व तयारी आढावा बैठकीत पालकमंत्र्यांच्या सूचना

आरंभ मराठी | धाराशिव

येत्या पावसाळ्यात चांगला पाऊस होण्याची शक्यता असल्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. जिल्ह्यातील बहुतांश शेतीही पावसाच्या पाण्यावर केली जाते. बहुतांश शेतकरी हे कोरडवाहू पद्धतीने शेती करतात. शेतकऱ्यांना यावर्षी चांगले उत्पादन झाले पाहिजे, यासाठी सन २०२५ च्या खरीप हंगामात जिल्ह्यातील कोणत्याही शेतकऱ्यांना निविष्ठा खरेदी करतांना अडचण जाणार नाही, याची दक्षता घेऊन कृषी निविष्ठांचा वेळेत पुरवठा करण्यात यावा, असे निर्देश पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.खरीप हंगाम पूर्व तयारी आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन समिती सभागृहात पालकमंत्री सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी ते बोलत होते. बैठकीला मित्राचे उपाध्यक्ष आमदार राणाजगजीतसिंह पाटील, खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आमदार कैलास पाटील, आमदार प्रवीण स्वामी, जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष, पोलीस अधीक्षक संजय जाधव, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रवींद्र माने यांची प्रमुख उपस्थिती होती. पालकमंत्री श्री.सरनाईक म्हणाले, येत्या खरीप हंगामात जिल्ह्यासाठी महाबीजच्या ज्या बियाण्यांची आवश्यकता आहे, त्याची मागणी आताच महाबीजच्या जिल्हा कार्यालयाने कृषी विभागाच्या समन्वयातून महाबीज अकोला यांच्याकडे करावी. त्यासाठी सातत्याने पाठपुरावा करावा. आपण स्वतःही त्यासाठी महाबीजच्या महाव्यवस्थापकांशी बोलणार आहोत. जिल्ह्यातील शेतकऱ्यांना बोगस खताच्या पुरवठा होणार नाही, याची दक्षता आतापासूनच घ्यावी. बोगस खतांची तपासणी करण्यात यावी. बोगस खत विक्री होत असल्याचे



लक्षात आल्यास तातडीने संबंधित कंपनी विरोधात कारवाई करण्यात यावी. शेतकऱ्यांना खत तपासणीसाठी किट उपलब्ध करून द्यावी, असेही सरनाईक यांनी सांगितले. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी माने यांनी कृषी विभागातील महत्त्वाच्या योजनेच्या लाभार्थ्यांची संख्या व वितरित करण्यात आलेला निधी याबद्दल आकडेवारी सांगितली.जिल्ह्यात माने यांच्या नेतृत्वात कृषी विभाग शेतकऱ्यांसाठी चांगल्या प्रकारे काम करीत असल्याबद्दल सरनाईक व खासदार राजेनिंबाळकर यांनी त्यांचे कौतूक केले.

# धाराशिव जिल्हा मजूर फेडरेशनच्या अध्यक्षपदी सतीश दंडनाईक




आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव जिल्हा मजूर फेडरेशनच्या चेअरमनपदी सतीश दंडनाईक यांची बिनविरोध निवड झाली असून,त्यांच्या निवडीबद्दल तुळजापुरचे आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी त्यांचा सत्कार करून अभिनंदन केले. मजूर फेडरेशनच्या निवडणुकीत भाजपला दणदणीत यश मिळाले. यानंतर अध्यक्षपदाची निवड भाजपचे नेते आणि आमदार राणा जगजितसिंह पाटील यांच्या नेतृत्वात करण्यात आली. अध्यक्षपदासाठी सतीश दंडनाईक यांचे एकमेव नाव आल्याने निवडणूक अधिकाऱ्यांनी दंडनाईक यांना मजूर फेडरेशनचे अध्यक्ष म्हणून घोषित केले. या निवडीनंतर दंडनाईक यांचे अभिनंदन करून आमदार राणा पाटील यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी पक्षाचे माजी जिल्हाध्यक्ष नितीन काळे, नेताजी पाटील, दत्ताभाऊ कुलकर्णी, विजय नाडे, निलेश शिंदे, नवनाथ नाईकवाडी, जयसिंग गायकवाड, श्रीमंतफंड आदीउपस्थित होते.

# काळाच्या ओघात हरवत चाललंय सारं काही..

आरंभ मराठीच्या रसिक वाचकांना नमस्कार. आजचे हे तेरावे पुष्प मी मुळच्या धाराशिवच्या पण सध्या पुण्यास वास्तव्य असलेल्या ११ वर्षे सहाय्यक प्राध्यपक म्हणून कार्य केलेल्या प्रा. माया मुळे यांच्या कवितांचा रसास्वाद घेऊन गुंफणार आहे. एम. ए. एम. एड. सेट, हेत्यांचे शिक्षण फर्ग्युसन महाविदयालय व सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे येथून झालेले आहे. सिंहगड एज्युकेशन सोसायटीचा आदर्श विद्यार्थी पुरस्कार त्यांना मिळालेला आहे हिंदी भाषा अनुवाद मध्ये त्यांना सावित्रीबाई फुले विदयापीठात प्रथम क्रमांक मिळालेला आहे, तसेच त्या सध्या हिंदी अनुवादक म्हणून पण कार्यरत आहेत, त्यांचे चित्रपट समीक्षा, पुस्तक समीक्षा, विविध माध्यमातून लेखन चालू असते. सध्या छत्रपती संभाजी नगर येथून प्रकाशित होणाऱ्या आधुनिक केसरी रविवार विशेष पुरवणीसाठी लेखन चालु आहे.त्यांच्या काहूर या कवितासंग्रहाला सनराईज हा राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार तसेच साहित्य ज्योती हा राज्य स्तरीय पुरस्कार प्राप्त झालेला आहे. सुनीता फाऊंडेशनचा सावित्रीमाई समाजरत्न पुरस्कार,तसेच अग्निपंख राज्य शैक्षणिकसमूहाचा विशेष पुरस्कार पण त्यांना प्राप्त झालेला आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व युनिव्हर्सिटी ऑफ साऊथ ईस्टर्न नार्वे यांच्या संयुक्त विधमान राबवण्यात येत असलेल्या संशोधन प्रकल्पासाठी त्यांची निवड झालेली आहे.विविध कवीसंमेलनांमध्ये त्यांचा सहभाग असतो, भिडेवाडा बोलला या आंतरराष्ट्रीय काव्यलेखन स्पर्धेत त्यांनातृतीय क्रमांक मिळाला होता.माजी केंद्रीय मंत्री मा. शरद पवार साहेबांच्या



नेतृत्वाखाली युवा लेखक – वाचक संवादात त्यांचा सहभाग होता. तर अशा शैक्षणिक, साहित्यिक, सामाजिक आघाड्यांवर कार्य करणाऱ्या कवयित्रीच्या तेवढयाच ताकदीच्या कविता आपण पाहू या.आपल्या सावित्री तुझं मोल या कवितेतीलतुझ्या कपाळावरच्या धगधगत्या चिरीनेध्वस्त करून टाकल्या साऱ्या लक्ष्मणरेषाज्या आखल्या होत्या, 'ती ' ला युगानुयुगे कैद करण्यासाठी !या चारच ओळीत पूर्ण सावित्री बाईचं कार्य आपल्या समोर उभं करण्याची क्षमता आहे असं मला वाटतं.तर बापाच्या डोळ्यातलं जग या कवितेतबालपणीचा बाप सतत भुरळ घालतो आजचा बाप सतत काळजाला घरं पाडतोसोडून येताना त्याला हंबरडा मग फुटतो ह्या ओळी वाचताना वृद्धत्वामुळं येणारी अगतिकता आणि आपण काहीच करू शकत नसल्याची असहाय्य भावना दाटून येते.तर माझ्या साठी तू या कवितेतहसत – खेळत उन्हा –पावसात जगून घेऊतुझ्यासाठी मी अन माझ्यासाठी तूवेळ मात्र दवडू नको अशी प्रेमळ दटावणी आपल्या सोबत्याला देत आहेत.आज जयंती आहे, पुण्यतिथी आहे या कवितेत कवयित्रीनं आजचं कटु व सत्य वास्तव मांडलं आहे. त्या णतात,आज जयंती आहे, पुण्यतिथी आहेसाजरी करावी लागेलमागच्या वर्षीचे ठेवणीतले फोटो पुन्हा नव्याने काढावे लागतीलआज गर्दीत हरवलेले सारे फोटों उदया परत एकटे होतील. अतिशय चिंतनशील कविता, महामानवांच्या कार्याचा, विचारांचा वारसा समर्थपणे चालवण्याऐवजी आपण फक्त उत्सव आणि भाषणबाजीतच अडकलो आहोत, हे दुसत्य या कवितेत आहे. तर काळाच्या ओघातहरवत चाललंय सारं या कवितेत कवयित्री आता चिमुरड्यांना आपण जसं मनसोक्त बालपण जगलो तसं जगता येत नाही याची खंत व्यक्त केली आहे,ती म्हणते,गोपाळकाला हा इथं उत्सव असतो मिळून डबे खाताना मात्र शिस्तभंग होतों!तर अशा या सामाजिक आशय आणि विषयांच्या कवितांचाआस्वादघेऊया.

## काव्यारंभ

**डॉ. रेखा अनिल ढगे**

## सावित्री तुझं मोल...

तुझ्या कपाळावरच्या धगधगत्या चिरीने
ध्वस्त करून टाकल्या साऱ्या लक्ष्मणरेषा
ज्या आखल्या होत्या
'ती' ला युगानुयुगे कैद करण्यासाठी
उंबरा ओलांडलास तु
आम्हाला मोकळं करण्यासाठी
अन तुझं स्वतः चं असं
मग काहीच उरलं नाही
प्रपंचा पलीकडे काही करायला
आम्ही आजही धजावत नाही
तु केलंस धाडस, पेललंस शिवधनुष्य
लावलंस पणाला सारं एक पण करून
पोटची लेकरं सांभाळताना, शिकवतांना
आमची तारांबळ आजही
तुला लोकांच्या पोरींचं पडलं होतं ग भारी
मातृत्व नसलं कि आजही
आमचं स्त्रीत्व नाकारलं जातं
अन एका विधवेचं मूलं पदरात घ्यायचं
हे आक्रीत केलंस तरी कसं!?
शरीर धर्माचा विटाळ पाळणाऱ्या
एकविसाव्या शतकातील आम्ही
अन अठराव्या शतकात तु
माणसांमधला विटाळ चव्हाट्यावर आणलास!
दोन स्त्रियांच्या जातीला किनार नाही आजही
अन बळी पडलेल्या मातृत्वाचं
दातृत्व केलंस तरी कसं!?
तुला भीती नाही वाटली का गं
ज्योतिबा गेल्यावर...
कि काही गमवायचं उरलं नाही बाकि
म्हणून स्वतः समिधा झालीस
इतिहास कानी– कपाळी ओरडून सांगतोय
तुझी गाथा
पुस्तकं बोलतात उघडल्यावर
हळूहळू डोक्यात पडतोय उजेड
मार्ग काढण्यासाठी
अन तुला रोज आठवावं लागतंय
घराबाहेर पडण्याआधी...

## माझ्यासाठी तू

तुझ्यासाठी मी
हक्क कुणावर गाजवावा अन कुणावर रुसावं
हेही एक कोडंय
तुझ्यासाठी मी अन् माझ्यासाठी तु हेच मला ठावंय
तू मनवावं म्हणून मला रुसावंस वाटतंय
तू पहावं म्हणून मला नटावंस वाटतंय
तू भांडावं म्हणून मला नडावं लागतंय
तू झुरावं म्हणून मला मिरवावं लागतंय
तुझ्या प्रत्येक श्वासांवर माझांच तर अधिकार आहे
नाही कळलं तुला तरी माझाच तर त्यात गंध आहे
तू बोलावं म्हणून तर अबोला आहे
बाकी शब्दांचा काही नेम नाही
डोळ्यांवटे त्यांची फितुरी दिवसेंदिवस वाढते आहे
बोलू नकोस काही फक्त कवेत घे
आसुसलेल्या क्षणांना केवळ तुझी ऊब दे
स्पर्शातूनच बोलू आपण शब्दांचाही छल नको
हक्क आहे माझा तुझ्यावर यात काही शंका नाही

दोन दिसांची जिंदगीही बघता बघता सरून जाईल
हसत–खेळत रुसतं–फुगतं उन्हा–पावसात जगून घेऊ
मनसोक्त जगण्याची ही आयुष्याला खंत नको
तुझ्यासाठी मी अन् माझ्यासाठी तू
वेळ मात्र दवडू नको

## आज जयंती आहे पुण्यतिथी आहे

आज जयंती आहे आज पुण्यतिथी आहे
साजरी करावी लागेल
मागच्या वर्षीचे ठेवणीतले फोटो
पुन्हा नव्याने काढावे लागतील
शासनाचे परिपत्रक येईल
आदेशांची सरबत्ती होईल
साजरा केल्याचे सारे पुरावे
सादर करावे लागतील

मिळतील हार–तुरे वर्षभरानी फोटोला
सभा कार्यक्रमांना येईल उधाण
व्यासपीठं सारी फुलून जातील
गुगलची ही मदत घेऊन
तासन् तास भाषणे झडतील
आज गर्दीत हरवलेले सारे फोटो
उद्या परत एकटे होतील

आज झाली सरबराई
उद्या आपल्या पंक्तीत जाऊन बसतील
यांच्यासमोरच पुन्हा नव्याने कागदी घोडे नाचतील
अन्याय होईल न्यायावर खऱ्याचं खोटं केलं जाईल
एखाद्याच्या मजबुरीला कायद्यात मात्र गोवलं जाईल
कायदेच उततील कायदेच मातातीलं
कायद्याच्याच गळफासाने निष्पाप गळे आवळले जातीलं
कचेरीतले फोटो मात्र निमूटपणे आसवे गाळतीलं

अविचाराने विचाराची दिवसाढवळ्या कत्तल होईल
जनावरागत माणसं सारी कळपासाठी भांडतील
कालची एकता कागदावरची कागदांमधल्या भाषणांपुरती
आज इथं माणसं नाही जातीपातींचा बाजार भरला
ज्याची–त्याची किंमत वेगळी जो–तो स्वार्थासाठी नडला
अन सारा बंधुभाव मात्र संविधानातचं विरला

सत्य एकटंच झगडत होतं
विचार वाळीत टाकले लोकांनी
समाजाचा द्वेष सारा विचाराच्या पाठीशी
विचार मात्र लढत होता एकटा, अर्धपोटी, उपाशी
संसार सारा उध्वस्त झाला घरदार पणाला लागलं
विचाराचं जीणं मात्र हालापेष्टातं न्हालं

उद्या कदाचीत एक फोटो
आणखी बनवला जाईल
आजच्या विचाराची पुन्हा
जयंती पुण्यतिथी येईल
फोटोंचीही रांग मात्र अशीच
वाढत जाईल
कचेरीची वाढेल शोभा
विचारांची होईल गर्दी
लोकशाहीचा उत्सव मात्र
असाच होत राहील



माया सूर्यकांत मुळे
(धाराशिव)
संपर्क–९४२३३४२०९७

## काळाच्या ओघात हरवत चाललंय सारं काही

काळाच्या ओघात हरवत चाललंय सारं काही
मोरपीस आणि पानं–फुलं कुणी पुस्तकात ठेवत नाही
नव्या पुस्तकांचा वास ही वर्गात दरवळत नाही
नव्याची नवलाई आणि अप्रुपता आता राहिली नाही
पोत्यांचा घोंगता पांघरून दप्तर पावसात भिजत नाही
चिखलात खेळायचं पावसात भिजायचं तर जंतुसंसर्ग होतो
सुरक्षिततेच्या नावाखालीफोडतात नेहमी टाहो
निसर्गाचं बाळकडू मग मिळत नाही
आयुष्यभर लढायला बळ मात्र उरतं नाही
गोपाळकाला इथं केवळ उत्सव असतो
मिळून डबे खातांना मात्र शिस्तभंग ठरतो
पेन्सिल चे तुकडे जुन्या पानांच्या वह्या
खोडरब्राचे तुकडे, पेनाची कांडी बदलणे
आमच्या वाट्याला नाही
खारमुरे चुरमुरे फुटाणे
चिंच बोरं आवळा, नि जांभळं
हे मर्यादा ओलांडत नाहीत
शालेय पोषणात मात्र यांना कुठेच जागा नाही
अनुभूती आधारित अध्यापन प्रकल्प पद्धती
ज्ञानरचनावाद आणि वगैरे वगैरे
अशी अनेक चर्चासत्रे आम्ही नेहमीच तर मांडतो
आजच्या पिढीला आधुनिक भारतासाठी
समृद्ध करत असतो

## बापाच्या डोळ्यांतल जग...

बापाच्या डोळ्यातलं जग धुरकटतं चाललं
दोन्ही डोळ्यांचं ऑपरेशन परवाच तर झालं
बापाला आता दुःखच केवळ पचतं
दातांनी त्याला चावता येत नाही
बापाचं जग आक्रसलं चार भिंतीत
स्वतः च्या पायावर त्याला चालता येत नाही
सैरावैरा धावणारा बाप आज एका जागी बसला
होता जरी सगळ्यात तरी एकटा भासला
उन्हा–पावसात तळला हाल–अपेष्टांत घडला
परिस्थितीनं नाडला तरी नाही नडला
कष्ट उपसणारा बाप आज कष्टी होतांना दिसला
सुरकूतल्या हातांनी थरथरत्या पायांनी
कापरं भरत उठला
काल आयुष्यं पेलली त्यानं आज हात शिणून गेले
धावण्यासाठी पावलात त्राण नाही उरले
भिंतीचा आधार वॉकरची साथ
आपल्याला जमत नाही म्हणून एका जागीच असतो
चारचौघात वावरणारा बाप आज एकटा
एकटाच बसतो
बालपणीचा बाप सतत भुरळ घालतो
आजचा बाप सतत काळजाला घरं पाडतो
सोडून येतांना त्याला हंबरडा मग फुटतो

# मुलांची सुट्टी करुया आनंददायी

उन्हाळी सुट्टी शालेय मुलांसाठी आनंदाची पर्वणी असते.या सुट्टीचा चांगला उपयोग केला तर मुलांना नव्याने खूप गोष्टी शिकता येतात.यामुळे मुलांच्या ज्ञानात भर पडते.अंगी असणारी कौशल्ये विकसित होतात.मुलांची निर्णयक्षमता वाढते.मुले धाडसी,कणखर आणि स्वावलंबी बनतात. यासाठी पालकांनी जाणीवपूर्वक वेळ काढला पाहिजे. योग्य नियोजन करुन सुट्टीचा सदुपयोग मुलांसाठी खूप फायदेशीर ठरु शकतो.

मुलांना सकाळी लवकर उठण्याची सवय लावा.मोकळया हवेत फिरायला घेऊन जा.योगा,ध्यान धारणा करण्याची सवय लावा.सूर्यनमस्कार, दोरीवरील उडया यामुळे शारीरिक तंदुरुस्ती रहण्यास मदत होईल.

घरातील छोटी आणि त्यांना करता येणारी कामे करण्याजबाबदारी सोपवा.जेणेकरून स्वावलंबी बनण्यास मदत होईल.

- वेळ काढून नातेवाईक,स्नेही, मित्रमंडळींना आवर्जून भेटवा. त्यांच्याशी बोलून जिव्हाळा आपुलकी वाढवा.
- बाजार,बँका,दुकाने,विविध व्यावसायिक, सरकार कार्यालये याठिकाणी मुलांना घेऊन जा.तेथील कामकाजाची ओळख करून द्या.
- जवळच्या अथवा परिचित शेतक–याच्या शेतीवर भेट देऊन मुलांना शेती,शेतकरी यांची ओळख करुन द्या. त्यांच्याशी बोलून शेतीविषयी माहिती द्या.
- परिसरातील विविध करागीर उदा.चित्रकार,शिल्पकार, मूर्तीकार यांची भेट घ्या. त्यांच्या कलेची माहिती जाणून घ्या.
- मुलांचे छंद जोपासा.उदा.पोहणे,चित्र काढणे,रांगोळी काढणे,हस्तकलेच्या वस्तू बनविणे,गायन करणे,विविध वाद्ये वाजविणे,करम खेळणे, बुद्धीबळ खेळणे,सायकल शिकणे इत्यादी.तसेच त्यांच्या आवडीचे खेळ.



- सुंदर हस्ताक्षराच्या सरावासाठी रोज नवीन उतारा लिहायची सवय लावा.
- वाचनाची गोडी लागण्यासाठी रोज अर्धा तास तरी गोष्टीची तसेच छोटी चरित्रपर पुस्तके वाचायला द्या.वर्तमानपत्रे वाचनाची सवय लावा भविष्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे.
- वाचनाची गोडी लागण्यासाठी रोज अर्धा तास तरी गोष्टीची तसेच छोटी चरित्रपर पुस्तके वाचायला द्या.वर्तमानपत्रे वाचनाची सवय लावा भविष्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे.
- वाचनाची गोडी लागण्यासाठी रोज अर्धा तास तरी गोष्टीची तसेच छोटी चरित्रपर पुस्तके वाचायला द्या.वर्तमानपत्रे वाचनाची सवय लावा भविष्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे.
- परिसरातील विविध क्षेत्रात नाव कमविलेली माणसे उदा. खेळाडू,शास्त्रज्ञ, लेखक, कवी,वक्ते,उद्योजक,डॉक्टर इत्यादी लोकांच्या छोट्या मुलाखती घेण्याचा प्रयत्न करावा.
- परिसरातील ज्ञानवृद्धी करणा–या उपक्रमात उदा. व्याख्याने,सांस्कृतिक कार्यक्रम, व्याख्यानमाला ,नाटके यात आपल्या सोबत मुलांना घेऊन जा.त्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला उपयुक्त ठरेल.
- संध्याकाळी ऊन कमी झाल्यावर अंगातून घाम येईपर्यंत मनसोक्त खेळू द्या.



लक्ष्मण जगताप बारामती
( आत्मप्रेरणा आणि लेट्स अचिव्ह या प्रसिद्ध पुस्तकाचे लेखक आहेत.)

# शासनाकडे परत गेलेली संयुक्त शाळा अनुदानाची रक्कम पुन्हा उपलब्ध करुन देण्याची मागणी



आरंभ मराठी | धाराशिव

## महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे पालकमंत्र्यांना निवेदन

जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांच्या नियमित वार्षिक खर्चासाठी समग्र शिक्षा अंतर्गत दरवर्षी दोन टप्प्यात संयुक्त शाळा अनुदान दिले जाते. २०२४–२५ या आर्थिक वर्षातील दुसऱ्या टप्प्याची रक्कम संदर्भीय पत्रान्वये मंजूर करण्यात आली होती. मात्र ही रक्कम अत्यंत विलंबाने म्हणजे आर्थिक वर्ष संपण्याच्या आदल्या दिवशी ३० मार्च रोजी ऑनलाईनवर उपलब्ध करण्यात आली. अगदी एक दिवसाची अत्यंत अल्प वेळ असल्यामुळे जिल्ह्यातील बहुतांश तालुक्यांना सदरील रकमेचे वितरण करता आले नाही. त्यामुळे जिल्ह्यातील शाळांचे सुमारे १ कोटी रुपयांचे अनुदान ३१ मार्च २०२५ रोजी परत गेले आहे. ही अनुदानाची रक्कम परत मिळावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या वतीने पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.समितीच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हा दौऱ्यावर आल्यानंतर गुरुवारी पालकमंत्री सरनाईक यांची भेट घेऊन उपरोक्त मागणी केली. निवेदनात म्हटले आहे की, शासनाच्या या अनुदानातून शाळांतील अनेक बाबींचा वार्षिक खर्च भागविला जातो. त्यामुळे या अनुदानाची शालेय कामकाज सुरळीत चालविण्यासाठी नितांत गरज आहे.मात्र, अनुदानाची रक्कम परत गेल्याने शाळांची अडचण निर्माण झाली आहे. शासनाकडे परत गेलेला निधी पुन्हा उपलब्ध करुन देण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे.निवेदनावर समितीचे पदाधिकारी शिवाजी कवाळे, रामदास गायकवाड, कल्याण बेताळे, बाबुराव कोकाटे, लक्ष्मण बनसोडे, रमेश बारसकर,विलास कंटेकुरे आदींच्या स्वाक्षऱ्याआहेत.

# शासकीय योजनांच्या अंमलबजावणीतून जिल्ह्याचे मागासलेपण दूर करणार

## महाराष्ट्र दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात पालकमंत्री प्रताप सरनाईक यांची ग्वाही

आरंभ मराठी | धाराशिव

जिल्ह्यातील शेवटच्या घटकाला योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सुक्ष्म नियोजनातून काम करण्यात येईल.जिल्ह्याचे मागासलेपण दूर करण्यासाठी आणि जिल्ह्याला आकांक्षित जिल्हा म्हणून लागलेला शिक्का पुसण्यासाठी तसेच जिल्ह्याचा सर्वांगीण विकास करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांची, उपक्रमांची, प्रकल्पांची व अभियानांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.।गुरुवारी १ मे रोजी ६६ व्या महाराष्ट्र राज्य स्थापना दिनाचे मुख्य शासकीय ध्वजारोहण पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालय येथे करण्यात आले. यावेळी त्यांनी राष्ट्रध्वजास मानवंदना देवून मराठवाडा मुक्ती संग्राम स्मृती स्तंभास पुष्पचक्र अर्पण केले. यानंतर उपस्थितांना संबोधित केले.



यावेळी स्वातंत्र्य सैनिक नागनाथ कुंभार,भास्कर नायगावकर, खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष,पोलीस अधीक्षक संजय जाधव,अपर जिल्हाधिकारी श्रीमती ज्योती पाटील,अपर पोलीस अधीक्षक अफशत आमना,जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव,निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव,उपजिल्हाधिकारी अरुणा गायकवाड, शिरीष यादव, संतोष राऊत, उदयसिंह भोसले, जिल्हा पुरवठा अधिकारी स्वाती शेंडे, जिल्हा नियोजन अधिकारी अर्जून झाडे, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी रविंद्र माने, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.धनंजय चाकूरकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतिश हरिदास यांच्यासह विविध यंत्रणांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते. सरनाईक बोलतांना म्हणाले, जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने महत्वपूर्ण असलेल्या नियोजन समितीकडून जिल्हा वार्षिक योजनेतून सन २०२४-२५ या वर्षात ४९५ कोटी ९६ लक्ष रुपये निधी खर्च करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.बचतगटांच्या उत्पादित मालाची विक्री करण्यासाठी तुळजापूर येथे उमेद मॉल उभारण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. आरोग्याच्या बाबतीत धाराशिव येथे ५०० खाटांच्या जिल्हा रुग्णालयास १६ फेब्रुवारी २०२४ रोजी राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. २०० खाटांच्या स्त्री रुग्णालयाला शासनाने मंजुरी दिली असुन लवकरच बांधकाम सुरु होणार आहे. आरसीएच कार्यक्रम ाअंतर्गत पाच वर्षात सातत्याने बालमृत्यू कमी करणारा जिल्हा म्हणून राज्यात प्रथम पुरस्कार, गुणवत्ता आश्वासन कार्यक्रमअंतर्गत १० प्राथमिक आरोग्य केंद्रांना राष्ट्रीय पातळीवर मुल्यांकन प्रमाणपत्र प्राप्त केल्याबद्दल राज्यस्तरीय द्वितीय पुरस्कार मिळाला आहे. धाराशिवच्या आरोग्यविषयक सुधारणांची दखल राज्यस्तरावर घेतल्याची ही पावती असल्याचे त्यांनी सांगितले. जिल्ह्यामध्ये अंदाजे १० हजार कि.मी. लांबीच्या १ हजार ३८७ शेतरस्त्यांचे मजबुतीकरण अभिसरणातून, सीएसआर फंडातून व लोकसहभागातून करण्यात येणार आहे. सन २०२४-२५ या वर्षात जिल्हा परिषदेच्या ३० शाळांमधुन सेमी इंग्रजी शिक्षणाची सुरुवात करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांनी विविध कृषीविषयक योजनांचा लाभ घेण्यासाठी ॲग्रीस्टॅक योजनेत सहभागी होवून ओळख क्रमांक प्राप्त करुन घेण्याचे त्यांनी आवाहन केले. महाराष्ट्र दिनानिमित्त पोलिस बॅन्ड पथक राष्ट्रगीत आणि राज्यगीत घून वाजवून मानवंदना दिली. या कार्यक्रमाला स्वातंत्र्य सैनिकांचे वारस, प्रतिष्ठित नागरिक, विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी, पत्रकार बांधव तसेच नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन व उपस्थितांचे आभार शिक्षक हणमंत पडवळ यांनी मानले.

## तृतीय पंथीयास महा ई सेवा केंद्र,पालकमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन



आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव जिल्ह्यातील एका तृतीय पंथीयास आपले सरकार महा ई सेवा केंद्र सुरू करून देण्यात आले. महाराष्ट्र दिनी याचे उदघाटन जिल्हयाचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी श्री कीर्ती किरण पुजार, जिल्हाधिकारी, धाराशिव, श्री संजय जाधव, पोलीस अधीक्षक, धाराशिव, श्रीमती शोभा जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी, श्रीमती मृणाल जाधव, तहसीलादर, धाराशिव, श्री बाबासाहेब अरवत, सहायक आयुक्त, समाजकल्याण उपस्थित होते

## ॲड. प्रवीण अत्रे यांची भारत सरकार नोटरीपदी नियुक्ती

आरंभ मराठी | धाराशिव



धाराशिव जिल्हा व सत्र न्यायालय धाराशिव येथे कार्यरत असलेले ऍड. प्रवीण अत्रे यांची विधी व न्याय मंत्रालय, विधी कार्य विभाग, नवी दिल्ली यांच्याकडून नुकतीच भारत सरकार नोटरी पदी नियुक्ती करण्यात आलेली आहे. याबद्दल त्यांचे त्यांच्या सर्व मित्रांकडून अभिनंदन होत आहे. यापूर्वी त्यांनी पोलीस विभागात विधी अधिकारी म्हणून कार्य केलेले असून सध्या ते गोदावरी महामंडळ, कृष्णा खोरे, नगरपरिषद व ज़िल्हा परिषद येथे कायदेशीर सल्लागार पदावर कार्यरत आहेत.

## ॲड. फरहीन खान पटेल यांची भारत सरकारच्या नोटरी पदावर नियुक्ती

आरंभ मराठी | उमरगा



उमरगा तालुक्यातील दाबका येथील विधीज्ञ ॲड. फरहीन खान पटेल यांची भारत सरकारच्या नोटरी पदी नियुक्ती करण्यात आली आहे. ॲड. खान-पटेल गेल्या अनेक वर्षांपासून जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयात वकिली व्यवसाय करत असून, त्यांच्या कार्यतत्परतेची दखल घेत भारत सरकारने त्यांची नोटरी पदी निवड केली आहे. नोटरी पब्लिक ऑटर्नी म्हणून ॲड. खान-पटेल यांची आता अधिकृत ओळख निर्माण झाली असून, त्यांच्या या यशाबद्दल उमरगा व लोहारा तालुका परिसरातून त्यांचे अभिनंदन व स्वागत करण्यात येत आहे. गावातील एका युवा वकीलाने मिळवलेली ही सन्माननीय जबाबदारी स्थानिकांसाठी अभिमानाची बाब ठरली आहे. त्यांच्या या पुढील कारकिर्दीसाठी सर्वत्र शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## श्री तुळजाभवानी मंदिर संस्थानामध्ये महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

आरंभ मराठी | तुळजापूर

महाराष्ट्र राज्य स्थापनेचा ६६ वा वर्धापन दिन सोहळा श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. महाराष्ट्र दिनानिमित्त सकाळी मंदिर संस्थानच्या प्रशासकीय कार्यालय येथे ध्वजारोहण सोहळा संपन्न झाला. तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) अरविंद बोळंगे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. १ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय कामगार दिन म्हणूनही साजरा केला जातो. ध्वजारोहणानंतर तहसीलदार तथा व्यवस्थापक (प्रशासन) अरविंद बोळंगे यांनी मंदिर संस्थानच्या सर्व कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र दिनाच्या व कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी मंदिर पोलिस चौकीचे सहायक पोलीस निरीक्षक अर्जुन चौधर, लेखाधिकारी संतोष भेंकी, सहायक व्यवस्थापक (स्थापत्य) राजकुमार भोसले, प्रवीण अमृतराव, सहायक व्यवस्थापक (विद्युत) अनिल चव्हाण, लेखापाल सिद्धेश्वर इंतुले, सहायक व्यवस्थापक (धार्मिक) अमोल भोसले, अनुप ढमाले, रामेश्वर वाले व मंदिर पोलिस चौकीचे पोलीस कर्मचारी आणि मंदिर संस्थानचे कर्मचारी उपस्थित होते.

## भोसले हायस्कूलमध्ये महाराष्ट्र दिन साजरा

धाराशिव-येथील श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये ६६ वा महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रथम प्रशालेचे मुख्याध्यापक नंदकुमार नन्नवरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण बालचमूने केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते गुरुवर्य के .टी . पाटील सरांच्या पुतळ्याला पुष्पहार घालण्यात आला. नवनीत चित्रकला स्पर्धेत जिल्हयात अनुक्रमे पहिली आलेली पलाशा संजय नलावडे , शिवन्या चव्हाण द्वितीय तर योगिता किरण गरड तृतीय आल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह , प्रशस्तीपत्र , नवनीत चित्रकला उपयुक्त साहित्य देऊन सत्कार करण्यात आला. या स्पर्धकांना चित्रकला शिक्षक शेषनाथ वाघ यांचे मार्गदर्शन लाभले. प्राचार्य नन्नवरे यांनी आपल्या भाषणात महाराष्ट्र दिनाचा इतिहास विदयार्थ्यासमोर मांडला. यावेळी आदर्श शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सुधीर पाटील , मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य पाटील , प्राचार्य नंदकुमार नन्नवरे , उपप्राचार्य संतोष घार्गे , उपमुख्याध्यापक प्रमोद कदम , तसेच सर्व सेवानिवृत्त शिक्षक आणि पर्यवेक्षक यशवंत इंगळे , श्रीमती बी .बी . गुंड , सुनील कोरडे , राजेंद्र जाधव , निखिल कुमार गोरे , धनंजय देशमुख , मोहन शिंदे , विनोद आंबेवाडीकर तसेच शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सूर्यकांत पाटील यांनी केले तर आभार उपमुख्याध्यापक प्रमोद कदम यांनी मानले तर वंदे मातरम् या गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात

आरंभ मराठी | अलूर

आलुर येथे महात्मा बसवेश्वर चौकात महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन सरपंच प्रतिनिधी रामराव जेऊरे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यांनतर ग्राम पंचायत कार्यालयात तंटामुक्तीचे अध्यक्ष शिरीष पाटील यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले.याप्रसंगीउपसरपंच जितेंद्र पोतदार,संतोष भाकरे व पत्रकार हणमंत शंके यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या जीवन चरित्रावर व त्यांच्या सामाजिक कार्याबद्दल आपले मनोगत व्यक्त केले. ग्रामविकास अधिकारी बिराजदार यांनी आभार मानले. यावेळी रामराव जेऊरे, शंकर व्हट्टे गुरुजी, ग्रामपंचायत सदस्य अण्णाराव पाटील, राजेंद्र मंटगे, मुकुंद क्षिरसागर, कल्याणप्पा लाटे, कृष्णा कांबळे व गुंडप्पा बिराडे संगप्पा ब्यालिकुळ्ळे, सिद्धप्पा ब्यालिकुळ्ळे, अशोक वाकडे, उपस्थित होते.

## भूम येथून इचलकरंजी आणि अकलूज बससेवा सुरू करण्याची व्यापारी वर्गाची मागणी



आरंभ मराठी | भूम

भूम शहर व तालुक्यातील व्यापारी बांधवांचा इचलकरंजी व अकलूज येथील मोठ्या बाजारपेठेशी असलेला व्यवहार विचारात घेता या मार्गावर तात्काळ बससेवा सुरू करावी अशी मागणी व्यापारी वर्गाने लेखी निवेदनाद्वारे भूम आगार प्रमुख व विभागीय नियंत्रक धाराशिव यांच्याकडे केली आहे. बुधवारी (दि.३०) भूम आगार प्रमुख व विभाग नियंत्रक धाराशिव यांच्याकडे भूम शहर व तालुक्यातील व्यापारी बांधवांनी नवीन बसेस सुरू करण्यासंदर्भात लेखी निवेदन दिले. यादरम्यान इचलकरंजी, अकलूज, नांदुरघाट या भागात मोठ्या बाजार पेठेतल्या व्यवहाराशी संबंध असल्यामुळे व्यापारी बांधव नागरिकांना सातत्याने येणे जाणे करावे लागते. थेट बस सेवा नसल्याने अनेक ठिकाणी बसेस बदलाव्या लागतात, यामुळे वेळ , पैसा, श्रम वाया जाते, शिवाय गैरसोय होते, यामुळे भूम आगाराच्या बसेस इचलकरंजी, अकलूज या मार्गावर सुरू करावी अशी मागणी केली आहे. निवेदनावर कोष्टी समाज ट्रस्ट अध्यक्ष विठ्ठल बागडे, सचिव शंकर खामकर, सदस्य योगेश आसलकर, उपाध्यक्ष शाम वारे, श्याम बागडे, युवराज वरवडे, शंकर मेहेत्रे, प्रकाश बागडे, अंबादास वरवडे, संतोष गुरसाळी, बाळू बाबर, प्रथम वरवडे , नवनाथ रोकडे , मनोज बोत्रे, योगेश दिवटे, सुनील दिवटे आदींच्या सह्या आहेत.

## राष्ट्रवादी पक्षाच्या तुळजापूर तालुका कार्यालयाचा अक्षय तृतीयेला शुभारंभ



आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर शहरात पोलीस ठाण्याच्या शेजारी शेटे कॉम्पलेक्स येथे अक्षयतृतीया व महात्मा बसवेश्वर यांची जयंतीचे औचित्य साधुन श्री.तुळजाभवानी व महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पुजन करुन राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी (अजित पवार गट ) तालुका संपर्क कार्यालयाचा शुभारंभ बुधवारी करण्यात आला. यावेळी वीरशैव संघटनेचे प्रफुल्लकुमार शेटे, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष श्रीकृष्ण सुर्यवंशी, रुपाली चनशेट्टी, पञकार अजित चंदनशिवे, श्रीकांत कदम, ज्ञानेश्वर गवळी, सतिश फत्तेपुरे, सुधीर बळवंते, भैरवनाथ भोसले, योगेश खुंटाफळे, नागनाथ स्वामी, करण कांबळे ,इमाम शेख, सोनु नरवडे यांच्यासह राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे कार्यकर्ते मोठ्या संखेने उपस्थित होते.

## नारंगवाडी येथील श्री जयराम विधालयात महाराष्ट्र दिन साजरा


आरंभ मराठी | नांरगवाडी

नारंगवाडी येथील श्री जयराम विद्यालय येथे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून गावातील मान्यवरांच्या उपस्थितीत ध्वजारोहण प्रशालेतील ज्येष्ठ शिक्षक जाधव एस डी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी गावातील जे तरुण नौकरीला लागले आहेत त्यांचा सत्कार करून गुणगौरव करण्यात आला. यात धीरज मोरे व महेश लोहार यांची महापारेषण मध्ये निवड झाल्याबद्दल तर विशाल लोहार आणि श्रीकार पाटील यांची एसआरपीएफ मध्ये निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेळी नारंगवाडी गावचे सरपंच शेखर घंटे, पोलीस पाटील हेमंत पाटील, संजय पवार तसेच मुख्याध्यापक अजय पवार व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.


## राज्यातील १६ शिक्षिकांना सर फाउंडेशनचा नारीशक्ती सन्मान पुरस्कार जाहीर,रविवारी वितरण

आरंभ मराठी | तुळजापूर

शिक्षणाक्षेत्रात विविध उपक्रमाद्वारे विद्यार्थी गुणवत्ता विकासासाठी कार्य करणाऱ्या आणि विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता व संस्कार रुजवणाऱ्या राज्यातील विविध जिल्ह्यातील १६ महिला शिक्षकांना स्टेट इनोव्हेशन अँड रिसर्च फाउंडेशन अर्थात सर फाउंडेशनचा राज्यस्तरीय नारीशक्ती सन्मान पुरस्कार जाहीर झाला आहे . सोलापूर येथील रंगभवन सभागृहात ४ मे रोजी मान्यवरांच्या शुभहस्ते पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार आहे. सर फाउंडेशन हे देश स्तरावरील प्रयोगशील व उपक्रमशील शिक्षकांचे नेटवर्क आहे . याद्वारे विविध उपक्रमांच्या माध्यमातून गुणवत्ता विकास व शिक्षकांचे सक्षमीकरण साधण्याचा प्रयत्न केला जातो .त्याचाच भाग म्हणून जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून राज्यस्तरीय नारीशक्ती सन्मान पुरस्कार सोहळा आयोजित केला जातो . महिला शिक्षकांनी नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धती , उपक्रमशीलता आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले प्रयत्न उल्लेखनीय आहेत . शिक्षण केवळ पुस्तकी न राहता समाज व प्रत्यक्ष जीवन मूल्यांशी त्यास जोड देण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला दिसून येतो . राज्यातील विविध जिल्ह्यातील १६ महिला शिक्षकांची या पुरस्कारासाठी निवड झाली आहे. पुरस्कार प्राप्त सर्व महिला शिक्षिकांचे हेमा शिंदे, सिद्धाराम माशाळे, बाळासाहेब वाघ , गुणवंत चव्हाण , अनघा जहागीरदार ,वसंत पुरे , समाधान शिकेतोड , मंजुषा स्वामी , उमेश खोसे यांनी पुरस्कार निवडीबद्दल अभिनंदन केले आह


**राज्यस्तरीय नारीशक्ती सन्मान पुरस्कार प्राप्त शिक्षिका**




प्रतिभा वसंतराव जोशी - अकोला , शीला जानरावजी नसराम -अमरावती , नीता भास्कर अरसुळे - जालना , ज्ञानेश्वरी आनंदराव शिंदे - धाराशिव , योगिनी यल्लाप्पा वैदू - रायगड , सत्यदेवी किशनराव बनवसकर - पनवेल , अंजली कमलाकर स्वामी -लातूर , महादेवी धोंडीराम पाटील - सांगली , मनीषा शंकर रामगुडे - सातारा , मंगला सुरेश नाईकनवरे - सोलापूर ,सोनी प्रभाकर कानडे - माळशिरस , ज्योती सचिन कलबुर्णे - मंगळवेढा ,प्रतिभा सुरेश जाधव - सोलापूर , किशोरी शिवाजी भोर -अहिल्यानगर , अश्विनी चंद्रकांत चव्हाण - सोलापूर

## बाजार समितीचे निरीक्षक अनंत गायके सेवानिवृत्त

आरंभ मराठी | कळंब

कृषी उत्पन्न बाजार समिती कळंब येथील आस्थापनेवरील निरीक्षक पदावर असणारे अनंत उत्तरेश्वर गायके यांच्या सेवानिवृत्तीच्या कार्यक्रमात प्रसंगी संचालक तुषार वाघमारे यांनी गायके यांच्या तीस वर्षाच्या उत्कृष्ट सेवेबद्दल त्यांचे कौतुक केले. बाजार समितीच्या वतीने गायके यांच्या सेवानिवृत्ती चा कार्यक्रम माजी सभापती शिवाजी कापसे, माजी उपसभापती श्रीधर भवर यांच्या मार्गदर्शनाखाली माजी संचालक तुषार वाघमारे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. कृषी उत्पन्न बाजार समितीत अखंड व चांगली सेवा दिल्याबद्दल समितीने यावेळी गायके यांचा यथोचित सन्मान केला.

# शिराढोण बसस्थानकाची सुरक्षा राम भरोसे

## स्थानक बनले तळीरामांचा अड्डा; विद्यार्थिनी आणि महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

### ग्रामीण बसस्थानकात सीसीटीव्ही कॅमेऱ्यासह सुरक्षेचा अभाव

अमोलसिंह चंदेल | आरंभ मराठी

शिराढोण –कळंब तालुक्यातील शिराढोण येथे सर्वात मोठे व कायम प्रवाशांची वर्दळ असणारे ग्रामीण बसस्थानक अस्तित्वात आहे. या ठिकाणी सीसीटीव्ही अभावी स्थानकाची सुरक्षा वाऱ्यावर असल्याचे चित्र दिसून येत आहे.१८ हजार लोकसंख्या असलेल्या शिराढोण गावास मध्यवर्ती ठिकाण समजून या गावास परीसरातील २० गावांचा संपर्क येतो. त्यामुळे दररोज हजारो प्रवासी या बस स्थानकावरून ये–जा करतात मात्र प्रवाशांची सुरक्षा सध्या रामभरोसे असल्याचे चित्र दिसत आहे. सुरक्षेच्या कुठल्याच उपाययोजना या स्थानकावर नसल्याने प्रवाशांच्या समस्या वाढल्या आहेत.

शिराढोण येथील सर्व्हे नं २१५ मधील २ एकर १२ गुंठे जमीन बसस्थानकाकरीता संपादीत करून महामंडळास देण्यात आली. ग्रामीण भागात जिल्ह्यातील सर्वात मोठ्या अशा विस्तीर्ण परिसरात लाखो रूपये खर्चून संरक्षक भिंतीसह बसस्थानकाच्या इमारतीचे बांधकाम करून हे बसस्थानक सन २००२ मध्ये परीसरातील प्रवाशांच्या सोई करीता खूले करण्यात आले. बसस्थानकाचे बांधकाम करताना वाहतूक नियंत्रन कक्ष, स्नॅक बार यासह चार फलाटांचा समावेश असलेली एक इमारत व त्याच्या बाजूस पिण्याच्या पाण्याची टाकी, प्रवाशांकरीता प्रसाधान गृह म्हणून सूसज्ञ शौचालय बांधण्यात आले. सर्व सोयींनी युक्त असे सुसज्ञ बसस्थानक येथे उभारण्यात आले. परंतु महिला, मुली, विद्यार्थिनी यांच्या सुरक्षेसाठी आजपर्यंत या बसस्थानकात काहीच करण्यात आलेले नाही. सायंकाळी पाच नंतर ना सीसीटीव्ही, ना कर्मचारी त्यामुळे सदरील बसस्थानक हे तळीराम यांच्यासाठी खुले असल्याचे चित्र पहावयास मिळते.




### अनुचित प्रकारास जबाबदार कोण

शिराढोण येथे शाळा, महाविद्यालय असल्यामुळे येथील विद्यार्थी याच बसस्थानकात येऊन बसची वाट पाहतात. गावातील काही विकृत टवाळखोर समूह येथेच असतात. सुरक्षेचा अभाव असल्याने यांना वाव मिळतो. त्यातूनच एखादा अनुचित प्रकार घडल्यास याची जबाबदारी कोण घेणार हा प्रश्न अनुत्तरित आहे.

### दोन शिफ्ट मध्ये वाहतूक नियंत्रक असणे गरजेचे

शिराढोण येथी स्थानकात एका शिफ्टमध्ये वाहतूक नियंत्रक कार्यरत आहेत. ते त्यांची जबाबदारी सकाळी १० ते ५ पर्यंत चोख बजावतात. परंतु सायंकाळी ५ नंतर हे स्थानक बेवारस असते. त्यामुळे या स्थानकात दोन शिफ्टमध्ये कर्मचारी आवश्यक आहेत. तशी मागणी प्रवाशी करत आहेत.

### पोलीस यंत्रणेने लक्ष देणे गरजेचे

सदरील बसस्थानकात शिक्षणासाठी इतर ग्रामीण भागातील मुलींची वर्दळ सातत्याने असते. त्या अनुषंगाने पोलीस यंत्रणेने सकाळी, दुपारी व सायंकाळी येथे व्हॅन घेऊन येऊन भेट देणे गरजेचे आहे. तसेच रात्रीही स्थानकात जाऊन अज्ञात व्यक्तीची चौकशी करणे आवश्यक आहे.

## कामगार दिनानिमित्त तुळजापूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

आरंभ मराठी | तुळजापूर

महाराष्ट्र दिन व कामगार दिनानिमित्त तुळजापूर शहरात जनहित कामगार युनियनच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून सर्व बांधकाम कामगार बांधवांना शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी जनहित कामगार युनियनचे संस्थापक अध्यक्ष अजय साळुंके, कामगार युनियनचे अध्यक्ष रवींद्र वाघमारे, उपाध्यक्ष सतीश साळुंके, संघटक आप्पा कदम, सचिव रजनीकांत जानराव, युनियनचे जेष्ठ कामगार पांडुरंग पांडागळे, वसंत रोकडे, अशोक देशमुख, नाना हंगरगेकर यांच्या उपस्थितीमध्ये सर्व कामगारांना शुभेच्छा देऊन येणाऱ्या काळामध्ये सर्व कामगारांची बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या कार्यालयात नोंदणी करून सर्व कामगारांचे अधिकार मिळवून देण्याचे आश्वासन देऊन कामगार दिन साजरा करण्यात आला.

## मलकापूर येथे सोमवारपासून अखंड हरिनाम सप्ताह

आरंभ मराठी | येरमाळा

कळंब तालुक्यातील मलकापुर येथील महान संत श्रेष्ठ सुभाष बप्पा लोमटे महाराज यांच्या १७ व्या पुण्यतिथी निमित्त श्री क्षेत्र दत्त मंदिर संस्थान येथे सोमवार, ५ मे पासून भव्य अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. यादरम्यान विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून, भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले असून.सप्ताहाची सुरुवात ५ रोजी सकाळी मलकापूरच्या प्रथम नागरिक रुक्मीनी घोळवे, आबासाहेब लोमटे यांच्या हस्ते कलश पूजन करून होईल. विना पुजन दत्ता पाटील, नरसिंग लोमटे,तात्याराव काकडे, गोविंद वणवे तर टाळ व मृदंग पुजन एकनाथ विठ्ठल लोमटे व पाशाभाई सय्यद, अच्युत लोमटे, प्रविण पायाळे, महादेव शिंदे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. सप्ताह व श्री सिद्ध सुभाष बप्पा विजय ग्रंथ पारायण व गुरुचरित्र पारायण सोहळ्याचे हे १७ वे वर्ष असून, त्याची सुरुवात श्री क्षेत्र दत्त मंदिर संस्थानचे मठाधीपती एकनाथ महाराज लोमटे यांनी केली आहे .या मंदिर संस्थानमध्ये २०१८ सालापासून भक्तांसाठी मोफत जेवणाची सोय करण्यात येते. ५ मे ते ११ मे या दरम्यान होणाऱ्या सप्ताहामध्ये एक हजार टाळकरी व २२ मृदंगाचार्यांची उपस्थिती हे प्रमुख आकर्षण असेल. या सप्ताहात दैनंदिन कार्यक्रमात पहाटे ४ ते ७ काकडा भजन, सकाळी ७ ते १० पारायण, १० ते १२ गाथा भजन, १२ ते ३ विश्रांती, ४ ते ६ हरिपाठ, ६ ते ८ भोजन, आणि रात्री ९ वाजता किर्तनाचा कार्यक्रम अशी सप्ताहातील दिनचर्या असेल. यामध्ये ५ सोमवारी ह.भ.प. समाधान महाराज शर्मा, ६ मंगळवारी ह.भ.प. पोपट महाराज कासारखेडकर, ७ बुधवारी ह.भ.प. अक्रुर महाराज साखरे, ८ गुरुवारी ह.भ.प. डॉ. जयवंत महाराज बोधले, ९ शुक्रवारी ह.भ.प. बाळु महाराज गिरगावकर, १० शनिवारी रामराव महाराज ढोक, दि. ११ रविवार रोजी सायंकाळी ५ ते ७ यांचे किर्तन होणार असुन त्याच दिवशी रात्री ९ वाजता ह.भ.प. एकनाथ महाराज लोमटे यांच्या काल्याच्या किर्तनाने व सुभाष बप्पांच्या पुण्यतिथी सोहळ्याने सप्ताहाची सांगता होणार आहे.

## टोम्पे खून प्रकरणाचा तपास विशेष यंत्रणेकडून करावा; भूम येथील कोष्टी समाजाची मागणी

आरंभ मराठी | भूम

परभणी जिल्ह्यातील पाथरी येथील टोम्पे कुटुंब प्रमुखाचा सावकारकीतील पैशाच्या मागणीसाठी अपहरण करून अमानुषपणे मारहाण करून खून केला, पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी आरोपीवर कठोर कारवाई करून कुटुंबाला दिलासा द्यावा अशी मागणी समस्त कोष्टी समाज बांधवांनी लेखी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री यांच्याकडे केली आहे. बुधवारी (दि.३०) उपविभाग अधिकारी भूम यांचे मार्फत मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या निवेदनात म्हटले की, पाथरी येथील अनंता हरिभाऊ टोम्पे हे वाहन चालक म्हणून काम करत असताना नेहमीच्या आर्थिक देवाणीच्या सावकारकीच्या येणे रकमेसाठी बेकायदेशीरपणे सावकारकी करणाऱ्यांनी अनंता टोम्पे यांचे घरातून अपहरण केले, त्यांचा दीड दिवस शोध लागला नाही, अखेर त्यांचा मृतदेह १४ एप्रिल रोजी दुपारी शौचालयात अतिशय निर्दयपणे अवस्थेत खून करून टाकलेला आढळला, या हत्या प्रकरणाचा विशेष तपास यंत्रणेकडून तपास करावा, आरोपीवर कठोर कारवाई करावी, बेघर असलेल्या टोम्पे कुटुंबीयांना तात्काळ जागेसह घरकुल बांधून द्यावे, त्यांचे पुनर्वसन करावे अशी मागणी कोष्टी समाज बांधव भूम तालुक्याच्या वतीने उपविभागीय अधिकारी भूम यांचे मार्फत मुख्यमंत्री यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

## हांडोग्री येथे डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

आरंभ मराठी | भूम

भूम तालुक्यातील हांडोग्री येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन भागवत शिंदे रिपाईं मराठवाडा उपाध्यक्ष यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच निळ्या झेंड्याचे ध्वजारोहण जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बाळासाहेब पाटील हांडोग्रीकर यांच्या हस्ते करून त्रिशरण पंचशील सामूहिकरित्या ग्रहण करण्यात आली. यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर नालंदा लोमटे, नैत्री लोमटे, तेजल साळवे आदीने भाषणे केली. ५१ वर्षाची परंपरा राखत महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर



यांच्या जयंतीच्या कार्यक्रमाला व गावातील कोणत्याही सामाजिक कार्यक्रमाला उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवणारे माजी पंचायत समितीचे सदस्य मुक्तप्पा तळेकर यांना महात्मा फुले पगडी शाल आणि भारताचे संविधान देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बाळासाहेब पाटील हांडोग्रीकर, मुक्तप्पा तळेकर, सरपंच संदीप मगर, ग्रामसेविका निलम जानराव, मुंबई पोलीस प्रियांका लोमटे, अशोक वाघमारे, झुंबर गायकवाड, संजय शिंदे, केरबाप्पा क्षीरसागर, बब्रुवान कदम, गुरूलिंग तळेकर, प्रभाकर कचरे, प्रशांत कदम, बलभीम तळेकर, अभिमान मस्के, बिभिषण कदम, आकाश टेकाळे, निलेश टेकाळे, रोहिदास टेकाळे, गौतम टेकाळे, राहुल बनसोडे, संघकार लोमटे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, आभार उपसरपंच रवींद्र लोमटे यांनी केले. सायंकाळी पाच वाजता मुख्य चौकातूनवाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली.

## जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहायता निधी

### धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे उदघाटन

आरंभ मराठी | धाराशिव

महाराष्ट्र दिनाच्या औचित्यावर जिल्हाधिकारी कार्यालय येथील जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रतापरावजी सरनाईक यांचे शुभहस्ते करण्यात आले या कक्षाच्या माध्यमातून दुर्धर आजारातील गरजु रुग्णांना मिळणाऱ्या मुख्यमंत्री सहायता निधी व त्याचा पाठपुरावा जिल्हास्तरावरून करणे सुलभ होणार आहे. या कक्षाच्या माध्यमातून जन आरोग्याशी निगडित असलेल्या योजनांचा जास्तीत जास्त गरजूंनी लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहायता कक्षाचे प्रमुख तथा



वैद्यकीय अधिकारी डॉ. सुरज मोटे यांनी केले आहे. यावेळी मा. खासदार ओम राजेनिंबाळकर तसेच मा. जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, मा. निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती शोभा जाधव, मा. तहसिलदार डॉ. मृणाल जाधव, तहसिलदार ज्योती चव्हाण, मा. अधिष्ठाता शा. वै. म व रु., डॉ. शैलेश चव्हाण, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकुरकर, मा. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतिष हारिदास, डॉ. कुलदिप मिटकरी, डॉ. विनयशील कुलकर्णी, श्रीमती अंकुशे, श्री. चिंतेवार, जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहायता कक्षाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सुरज मोटे, श्री. तुकाराम डोलारे, समाजसेवा अधीक्षक श्री. मनेश खंडागळे हेउपस्थित होते.

## लहानग्यांचा मोठा पराक्रम! मुरुमच्या गुरुकुल स्कूलचे खेळाडू देशपातळीवर झळकले

आरंभ मराठी | मुरुम

मुरुम शहरातील गुरुकुल प्री – प्रायमरी इंग्लिश स्कूलने नाशिक येथे २९ व ३० एप्रिल रोजी आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या दांडपट्टा राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत चमकदार कामगिरी करत ५ सुवर्ण आणि १ रौप्य पदकांची कमाई केली. यासोबतच धाराशिव जिल्हा संघानेही सांघिक गटात तृतीय क्रमांक पटकावून आपली छाप सोडली. ही स्पर्धा मीनाताई ठाकरे विभागीय क्रीडा संकुल, पंचवटी नाशिक येथे पार पडली. गुरुकुल प्री–प्रायमरी सेमी इंग्लिश स्कूल, मुरुम येथील खेळाडूंनी 'मुक्तशैली' प्रकारात उल्लेखनीय कामगिरी केली. देवांश राहुल चिलोबा (वय ५) याने २ सुवर्ण पदके पटकावली, तर तेजस्विनी स्वप्नील पाटील (वय ६) हिने रौप्य पदक मिळवले. तसेच राजवीर बळीराम चौधरी (वय ७) याने २ सुवर्ण पदके जिंकली. लाव्या नागनाथ वाघमारे (वय ८), प्रत्यूषा प्रवीण सोमवंशी (वय ९), आणि गोविंद व्यंकट रूपनूर (वय १०) यांनी प्रत्येकी एक सुवर्ण पदक प्राप्त केले.




या सर्व यशस्वी खेळाडूंना दांडपट्टा इंडियाचे अध्यक्ष महागुरू सुभाष मोहिते, सचिव संभाजी अहिरराव, धाराशिव जिल्हा दांडपट्टा अध्यक्ष अजय शहा, डॉ. प्रीती चिलोबा, गुरुकुल स्कूलच्या मुख्याध्यापिका मयुरी चौधरी, टीम मॅनेजर वजीर शेख, पंच आदिनाथ गोरे आणि मार्गदर्शक मोहम्मद रफी शेख यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या या यशाबद्दल सर्व पालकांकडून अभिनंदन व कौतुक होत आहे. स्पर्धेत यश संपादन करून मुरुम येथे आले असता शाळेच्या वतीने फुलांचा वर्षाव करत सर्वच विजेत्या खेळाडूंसह सोबत असलेल्या सर्वांचेच उत्साही वातावरणात स्वागत करण्यात आले.

### दांडपट्टा राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत ५ सुवर्ण, १ रौप्य पदकांची कमाई

डॉ. रामानुजन इंग्लिश स्कूल, उमरगा येथून आराध्या प्रभाकर जाधव (वय ८), रमण राहुल सैनी (वय ११), आयुष युवराज पवार (वय ११), आणि साहिल मोहम्मद रफी शेख (वय १४) यांनीही सुवर्ण पदके मिळवली. विशेषतः साहिलने दोन सुवर्ण पदकांची कमाई केली. कुमारस्वामी प्राथमिक विद्यालय, उमरगा येथील आदित्य अविनाश साळी (वय ११) याने रौप्य पदक मिळवले, तर माऊली इंटरनॅशनल सीबीएसई स्कूलचे अनुज विक्रम सूर्यवंशी (वय ११) याने सुवर्ण पदक जिंकले. खुल्या गटात मेहबूब पठाण यांनी रौप्य पदक पटकावले.

भीती न आम्हा तुझी मुळी, हे गडगडणाऱ्या नभा,आसमानाच्या सुलतानीला जवाब देती जिभा!

## मुरुममध्ये महाराष्ट्र दिन, कामगार दिन साजरा; हुतात्म्यांना अभिवादन

आरंभ मराठी | मुरुम

''मुंबई आणि महाराष्ट्र हे वेगवेगळे नसावेत'' या निर्धाराने सुरू झालेल्या संयुक्त महाराष्ट्र चळवळीत १०५ हुतात्म्यांनी आपले प्राण अर्पण केले. या हुतात्म्यांना अभिवादन करण्यासाठी व महाराष्ट्र दिन तसेच आंतरराष्ट्रीय कामगार दिनाच्या निमित्ताने मुरुम शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील सर्व शाळा, महाविद्यालये, शासकीय कार्यालये, बँका, पतसंस्था आणि नगरपरिषद येथे ध्वजारोहण करून देशभक्तांना अभिवादन करण्यात आले. मुरुम नगरपरिषद कार्यालयात सकाळी आठ वाजता नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सचिन भुजबळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.या वेळी कार्यालयीन अधीक्षक विशाल अमृतराव, भागवत झिंगाडे, पवनकुमार सुतार, राहुल यादव, श्रीराम नाडे, प्रवीण सोनवणे, गौरव वडे, मुनीर पाशा जेवळे, रविकांत म्हस्के, आतीक अत्तार आदी पदाधिकारी उपस्थित होते. यासोबतच ॲड. उदय वैद्य, डॉ. शिवशंकर कारडामे, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष अशोक मिनीयार, पत्रकार संघटनेचे उपाध्यक्ष नहीरपाशा मासूलदार, राजेंद्र घोडके, शिक्षक विजयकुमार हिरेमठ यांच्यासह शहरातील विविध मान्यवर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीत व राज्यगीत गायन करण्यात आले. यावेळी नगरपरिषदेचे अधिकारी गौरव



वडे यांनी आपल्या भारदस्त आवाजात 'महाराष्ट्र गीत' सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. मुख्याधिकारी सचिन भुजबळ यांनी महाराष्ट्र व कामगार दिनाच्या शुभेच्छा देत कामगार वर्गाच्या योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले. यावेळी नगरपरिषदेचे सर्वच पदाधिकारी कर्मचारी व कामगार उपस्थित होते.

## झिरो पेंडन्सी,वैद्यकीय अधीक्षक डॉ. लाकाळ यांचा पालकमंत्र्यांकडून गौरव




आरंभ मराठी | धाराशिव

विधी व सेवा हक्क अधिनियम अंतर्गत प्रशासकीय कामकाजात झिरो पेंडन्सी असणाऱ्या अधिकाऱ्यांचा शासनाच्या वतीने सन्मान करण्यात येतो. जिल्हा शासकीय रुग्णालयात दिव्यांग बोर्डाच्या फाईल पेंडिंग न ठेवल्याबद्दल या विभागाचे प्रमुख तथा वैद्यकीय अधीक्षक डॉ. तानाजी लाकाळ यांचा पालकमंत्र्यांकडून गौरव करण्यात आला.महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर गुरुवारी सकाळी आयोजित करण्यात आलेल्या समारंभात डॉ.तानाजी लाकाळ यांना पालकमंत्री प्रताप सरनाईक यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.जिल्हा शासकीय रुग्णालयात दिव्यांग बोर्डाचे कामकाज हा महत्वाचा भाग आहे. सर्वसामान्य कुटुंबातील दिव्यांग बांधवांना जिल्हा रुग्णालयाकडून तातडीने सेवा दिल्या जातात. या कामाची दखल घेऊन शासनाच्या वतीने हा सन्मान करण्यात आला.या सत्काराबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.